# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५७५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१७/०९/२०१६

**१) मोटारची चोरी . :–**

दिनांक १४/०९/२०१६ रोजी १२.०० ते १५/०९/२०१६ चे १५.०० वा. दर. यातील फिर्यादी नरेश प्रभाकर चकोले वय ३९ वर्ष, रा. पांढराबोडी यांच्या शेताजवळील नाल्यावर पाणी देण्याकरीता लावलेली २ एचपी २१/२/२ कोरमास्ट कंपनीची सिएम नं. १०४१६ सी १०४५४ कि. ११,३००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) महीलेस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक १४/०९/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी ही भंडारा न्यायालयात साक्षपेक्षी न झाल्याने घरी परत जात असता यातील आरोपीने फिर्यादीस गैरपने/इच्छापुर्वक अटकाव करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन न्यायालयात साक्ष दिली तर जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,२९४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. तोडासे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन डोक्याचे केस पकडुन व हाताला चावा घेतल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील आरोपी क्र. १ ने किराणा दुकानाचे उधारीचे पैसे का कापले म्हणुन भांडण केले व आपली आई आरोपी क्र. २ हिचे सोबत संगनमत करुन फिर्यादीचे घरा समोर येवुन शिविगाळ करीत असतांना फिर्यादीने आरोपीतांना हटकले असता आरोपी क्र. १ हा धावत येवुन फिर्यादीचे डोक्याचे केस पकडुन उजव्या हाताला चावा घेतल्याने फिर्यादीचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) विवाहीतेचा विनयभंग :–**

दिनांक १६/०९/२०१६ रोजी ०७.३० वा. दर. यातील फिर्यादी ही दुध विक्रीचा व्यवसाय करीत असुन ती घरी हजर असतांना यातील आरोपी हा तीचे घरी आला व तीला तुप आहे का असे विचारणा केली तेव्हा तीने तुप आहे ते मी विरघळवुन देत असे म्हणुन स्वयंपाक खोलीत तुप वितळविण्यास गेली असता आरोपी हा तीचे मागे जावुन स्वयंपाक खोलीत आला व कमरेवर डाग कशाचा आहे असे म्हणुन फिर्यादीचा हात पकडुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३५४(अ)१,४४८ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आडे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

५) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :-

दिनांक १६/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा व तुमसर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १०० लिटर हातभट्टी दारू + सडवा साहीत्य कि. २३,२४५/–रु. तसेच जुगारातुन कि. २,९० /–रु. असा एकुण २३,५३५/–रू. चा माल जप्त करण्यात आला

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.